Vol 2 Issue 7 April 2013

ISSN No : 2249-894X

*Monthly Multidisciplinary Research Journal*

# *Review Of Research Journal*

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

## Welcome to Review Of Research

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

*Review Of Research*
Vol. 2, Issue. 7, April. 2013
**ISSN:-2249-894X**
Available online at www.ror.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील मजूरांचा सहभाग

**तुकाराम नारायण शिंदे**

इतिहास विभाग , अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालय,सोलापूर.

*सारांशः*

भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये महिला शेतकरी वर्गाप्रमाणेच मजूर वर्ग ही सहभाग झाला होता. भारतात ब्रिटिशांनी स्वहितासाठी कारखाने उभारले होते. जगातील भांडवलदारा प्रमाणेच ब्रिटिशांकडूनही भारतातील कारखान्यातून मजूरांची पिळवणूक होत होती. भारतातील मजूरांनी या पिळवणूकीविरोधी चळवळ सुरु केली होती. पुढे मजूरांची चळवळ भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा एक भाग बनली पण मजूरांनी याशिवाय भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये प्रसंगानुरुप प्रत्यक्ष सहभागी झाले होते.

## *प्रस्तावना :*

### ३) भारतीय मजूर वर्गाचा उदय

भारतात ब्रिटिशांचे आगमन होण्यापर्वी येथे कुटीरोद्योग होते. १८व्या शतकात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली. आणि भारतातील कुटीरोद्योग जवळ–जवळ संपुष्टात आले. इंग्लंडने पुढील काळात आपल्या देशातील कारखाने नियमित सुरळीत रहावे या हेतूने त्यांनी भारताला कच्चा मालाचा नियमित पुरवठा करणारी व फक्त माल विकत घेणारी हक्काची बाजारपेठ बनवली होती.

परंतु पुढील काळात भारतातील ब्रिटिश राजवटीने येथेही उद्योगधंदे उभारण्यास प्रोत्साहन दिले. भारतात लॉर्ड डलहौसीच्या कारकिर्दीपासून उद्योगधंदे उभारले जाऊ लागले होते. इ.स. १८५३ पासून भारतात रेल्वे सुरु झाली. दळणवळण यंत्रणेत यंत्राचा वापर सुरु झाला. रेल्वे रुळ टाकण्यासाठी व यंत्रांना लागणारा कोळसा काढण्यासाठी हजारो मजूर काम करु लागले होते. तसेच याकाळात रेल्वेशी संबंधीत इतर अनेक उद्योग विकसित झाले याचदरम्यान भारतात इतरही उद्योग सुरु झाले. इ.स १८५४ मध्ये भारतातील पहिली कापड गिरणी मुबंई व पहिली ज्यूट मिल कलकत्ता येथे सुरु झाली. चहाच्या मळ्यातही शेकडो मजूर कार्यरत होते पुढे या सर्व पार्श्वभूमीवर हा काळ मजूरांच्या उदयांचा काळ ठरला. पुढे जशी कारखानदारी वाढत गेली तशी मजूरांची संख्याही वाढत गेली. इ.स.१९०४ मध्ये कोळसा खाणी मध्ये काम करणाऱ्या मजूरांची संख्या ७५७४९ पर्यंत वाढली होती. इ.स. १९०५ मध्ये कापड उद्योगात काम करणाऱ्या मजूरांची संख्या ७४००० तर इ.स. १९०६ पर्यंत ज्यूट उद्योगातील कामगारांची संख्या १,५४,९६२ पर्यंत वाढली होती.

### प्रारंभीची स्थिती व भारतीय मजूर

भारतातील मजूर व जगातील मजूर यांच्या समस्या सारख्याच होत्या. कमी मजूरी, जास्त वेळ काम, बालमजूर, अस्वच्छता व सोयी सुविधांचा अभाव या मजूरांच्या समस्या होत्या. भारतातील मजूरांना परकीय राजवटी बरोबर भारतीय भांडवलदार व परकीय भांडवलदार यांच्याकडून होणाऱ्या शोषणाला बळी पडावे लागत होते. या पार्श्वभूमीवररच भारतीय मजूरांची चळवळ ही भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा भाग बनली होती असे मत "History of modern India' या ग्रंथात बी.एल. ग्रोबर यांनी मांडले आहे.

भारतातील मजूरांनी आपल्या न्याय हक्कसाठी या पार्श्वभूमीवरच चळवळ सुरु केली होती. अर्थात कमी मजूरीमुळे भारतीय कापड उद्योग आपणास प्रतिस्पर्धा ठरेल या भितीमुळे भारतीय उद्योगधंद्यात काम करणाऱ्या कामगारांची स्थिती सुधारावी अशी मागणी प्रथम लँकेशायर येथील कापड गिरण्यांच्या मालकांनी केली होती. तसेच भारतीय मजूरांच्या स्थितीचा अभ्यास करण्यासाठी इ.स. १८७५ मध्ये पहिला आयोग नेमण्यात आला. मजूरांचे पहिले पुढारी नारायण मेघाजी लोखंडे यांच्या प्रयत्नामुळे इ.स. १८८४ मध्ये पहिला फॅक्टरी

ॲक्ट मंजूर झाला होता. पहिला फॅक्टरी ॲक्टनुसार ७ वर्षाच्या खालील मुलाला मजूर म्हणून काम करण्यास प्रतिबंध घालण्यात आला, १२ वर्ष खालील बालमजूरांच्या कामाचे तास कमी करावेत आणि धोकादायक यंत्राभोवती संरक्षक कठडे लावावेत असे निर्देश करण्यात आले. इ.स. १८९१ मध्ये दुसरा फॅक्टरी ॲक्ट मंजूर झाला होता. दुसऱ्या फॅक्टरी ॲक्टनुसार महिलांसाठी कामाचे ११ तास व मध्ये दिड तास विश्रांतीचे असावेत, लहान मुलांसाठी असलेली वयोमर्यादा ७ वर्ष व १२ वर्ष यावरुन अनुक्रमे ९ वर्ष व १४ वर्ष इतपत वाढविण्यात आली होती. यावरुन ब्रिटिश मजूरांच्या समस्याबाबत जागरुक होते असे दिसले.

**मजूरांच्या संघटना**

१९व्या शतकात शेवटी कामगारांच्या संघटना स्थापन होऊ लागल्या होत्या इ.स. १८९० मध्ये मुबंई गिरणी कामगार संघटना स्थापन झाली. पुढील काळात इ.स. १८९७ मध्ये भारत–ब्रम्हदेश कर्मचारी संघटना इ.स. १९०५ मध्ये कलकत्ता छापखाना संघ इ.स.१९०९ मध्ये मुबंई डाक कर्मचारी संघ या संघटनांची स्थापन झाली. इ.स. १९१८ मध्ये डॉ.ॲनी बेझंट बी.पी वाडिया यांनी 'मद्रास लेबर युनियन' ही संस्था स्थापन केली होती.

पहिले महायुध्द सुरु झाल्यानंतर मजूर संघटना स्थापन होण्यास आणखी प्रोत्साहन मिळाले. पहिल्या महायुध्दात वस्तुंच्या किमंती खुप वाढल्या पण कामगारांची मजूर वाढली नाही, यामुळे कामगार वर्ग प्रचंड असंतुष्ट झाला होता. पहिले महायुध्द संपुष्टात आले. तेव्हा आंतरराष्ट्रीय मजूर संघटना (International Labaur Organization) अस्तित्वात आली. यामुळे मजूरांना आंतरराष्ट्रीय व्यासपीठ मिळाले. पुढे याचेच अनुकरण करुन राष्ट्रीय स्तरावर अशी संघटना निर्माण करण्यात राष्ट्रीय पुढाऱ्यांनी पुढाकार घेतला. आणि ३१ ऑक्टोबर १९२० रोजी नारायण मल्हार जोशी यांनी All India Trade Union Congress ( अ.ख.ढ.ण.उ.) या संघटनेची स्थापना केली. अखिल भारतीय ट्रेड युनियन काँग्रेसचे पहिले अध्यक्ष लाला लजपतराय यांना करण्यात आले होते. लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय ट्रेड युनियन काँग्रेसचे पहिले अधिवेशन मुबंई येथे इ.स. १९२० मध्ये भरले होते. बॅपटिस्टा हे या अधिवेशनाचे उपाध्याक्ष होते. पुढे बॅ. चित्तरंजनदास, व्ही.व्ही. गिरी, सरोजिनी नायडू, जवाहरलाल नेहरु व सुभाषचंद्र बोस यांनी या संघटनेचे अध्यक्षपद भुषविले होते. पुढे इ.स. १९२९ मध्ये साम्यवादामुळे अखिल भारतीय ट्रेड युनियन काँग्रेसमध्ये फूट पडली. साम्यवादी विचारांच्या लोकांनी भारतीय ट्रेड युनियन फेडरेशन ही स्वतंत्र संघटना स्थापन केली तर इ.स. १९३१ मध्ये डाव्यानी अखिल भारतीय लाल ट्रेड युनियन काँग्रेस ही संघटना स्थापना केली शिवाय पुढे राष्ट्रीय सभेने (काँग्रेस) इ.स.१९४७ मध्ये भारतीय राष्ट्रीय ट्रेड युनियन काँग्रेस ही संघटना स्थापन केली होती.

**भारतीय मजूर चळवळ**

पहिल्या महायुध्दानंतरची परिस्थिती, रशियातील बोल्शेविक क्रांती आणि जागतिक क्रांती लाट, ह्या घटनामुळे भारतातील मजूर वर्ग कृतीसाठी संघटित झाला होता आणि पुढे या संघटनेतूनच भारतात आधुनिक मजूर चळवळ उदयास आली होती. पहिल्या महायुध्द काळात मालक वर्गाने प्रचंड नफा कमवला होता. याच काळात अखिल भारतीय राष्ट्रीय सभा (काँग्रेस) आणि मुस्लिम लीग ह्यांनी त्वरीत स्वराज्य मिळवण्याच्या कार्यक्रमासाठी एकी घडवून आणली होती. मजूर वर्गात जागृती घडून येण्यास ही स्थिती उपयुक्त ठरली. मजूर वर्गाने इ.स. १९१८ पासून संपाची चळवळ सुरु केली. इ.स. १९२० पर्यंत मजूरांनी सर्वत्र संप करुन देशाला हादरुन सोडले ४ नोंव्हेबर ते २ डिसेंबर १९१९ याकाळात कानपूर वुलन मिल्स मधील १७,००० मजूर संपावर गेले होते ९ जानेवारी ते १८ जानेवारी १९२० ह्या काळात कलकत्ता येथील ताग मिलमधील ३५,००० मजूर संपावर गेले होते. २ जानेवारी ते ३ फेब्रुवारी १९२० याकाळात मुंबईत सार्वत्रिक संप झाला. यामध्ये दोन लाख कामगार संपावर गेले होते. २६ जानेवारी ते १६ फेब्रुवारी १९२० रोजी सोलापूरमधील १६००० मजूर संपावर होते देशभर अशाच प्रकारे अनेक संप घडून आले होते एकूण इ.स. १९२० यावर्षातील पहिल्या सहा महिन्यात असे २०० संप घडून आले होते व त्यामध्ये १५ लाख मजूर सहभागी झाले होते या सर्व स्थितीतूनच भारतात मजूर चळवळ जन्मास आली होती.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीमधील मजूरांचा प्रत्यक्ष सहभाग

भारतात वेगवेगळ्या उद्योगधंद्यातील मजूरांनी आपल्या संघटना स्थापन केल्या होत्या. या संघटना मालक वर्गाबरोबर परकीय सत्तेविरोधी लढत होत्या शिवाय भारतीय मजूरांनी भारतीय स्वातंत्र्याचा राजकीय चळवळीमध्ये प्रत्यक्ष सहभाग घेतला होता. इ.स. १९०८ मध्ये लोकमान्य टिळकांना काळ्या पाण्याची शिक्षा झाली. तेव्हा याच्या निषेधार्थ मुंबई येथील सर्व कापड गिरणीतील मजूर सहा दिवस संपावर गेले होते मुंबई मजूरांच्या या संपामुळे रशियन साम्यवादी नेता लेनिन प्रभावित झाला होता. यावेळी लेनिनने प्रतिक्रिया दिली होती की, भारतीय पददलित इतके परिपक्व आहेत की, ते राजकीय लोकसंघर्ष चालू शकतात.(The Indian protetartat has already mutured sufficiently to wage a class Conscinus and political mass struggle.) राष्ट्रीय सभेने इ.स. १९१९ मध्ये रौलेट ॲक्ट विरुध्द हरताळ पुकारला होता. त्यामध्ये मजूर वर्ग ही सहभागी झाला होता.

इ.स. १९२० ते १९४७ हा कालावधी भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये गांधीयुग म्हणून ओळखला जातो. महात्मा गांधीजी यांनी या कालावधी मध्ये असहकार चळवळ (१९२०) सविनय कायदेभंग चळवळ (१९३०) आणि चले जाव चळवळ ( १९४२) अशा तीन मोठ्या चळवळी घडवून आणल्या होत्या. महात्मा गांधीजींनी असहकार चळवळीपासून शेतकरी वर्गाबरोबर मजूरांनी आपल्या चळवळीत सहभाग करुन घेण्यास प्रारंभ केला होता.

महात्मा गांधी यांच्या चळवळीच्या काळात इ.स. १९२९ मध्ये मजूर चळवळीच्या दृष्टीने महत्वाचा ठरलेला ‘मीरत खटला’ ही घटना घडून आली. भारतातील मजूर चळवळ आंतरराष्ट्रीय साम्यवादपासून दूर रहावी यासाठी ब्रिटिश सरकार प्रयत्नशील होते. यादृष्टीने व्हाईसरॉय लॉर्ड आयर्विनने इ.स. १९२९ मध्ये खास वटहुकूम (The Trade Distputes Act) काढला होता. त्यानुसार इतर बाबीबरोबरच रेल्वे, पाणी, विज ह्यासारख्या सार्वजनिक सेवेतील हरताळासाठी एक महिन्याची पुर्व सुचना देणे बंधनकारक करण्यात आले होते. भारतातील मजूर वर्गाच्या न्याय हक्काची गळचेपी करण्यासाठीच हा खास वटहुकूम काढण्यात आला होता. भारतातील मजूर चळवळीला पायबंद बसावा या हेतुनेच इ.स. १९२९ मध्ये आयर्विन सरकारने मजूर चळवळीच्या मुख्य नेत्यांना पकडले व त्यांना खटल्यासाठी मीरत येथे आणले होते.

इंग्लंडच्या राजाची सत्ता उलथून पाडण्याचा कट केल्याचा आरोप मजूर चळवळीच्या (ट्रेड युनियन) नेत्यावर ठेवण्यात आला. यामध्ये या आरोपाखाली ३१ जणांवर खटला भरण्यात आला होता. यामध्ये एस.व्ही. डांगे, किशोरिलाल घोष, डी.आर.हेंगडी, एस. व्ही. घाटे, के.एन. जोगळेकर, एस.एच. साबावाला, शौपत उस्मानी, मुझप्फर अहमद, फिलिप स्पॅट, बी.एफ. ब्रडेल, एस.एस. मिरजकर, पी.सी. जोशी, ए.ए.अल्व्हे, जी.आर. करले, गोपाल बसक, जी.एम.अधिकारी, एम.ए. अमजिद, आर.एस. निबकर, विश्वनाथ मुखर्जी, किदारनाथ सेहगल, राधारमण मित्र, धरणी, के गोस्वामी, गौरीशंकर,शामशुल हुडा, शिबनाथ बॅनर्जी, गोपेंद्र चक्रवती, सोहन सिंग जोशी, एम.जी. देसाई, अनुध्या प्रसाद, लक्ष्मणराव कदम, एच.एल. हटचिन्सन इ.चा यामध्ये समावेश होता. भारताच्या इतिहासामध्ये एक दीर्घसुत्री व मोठ्या परिश्रमाने निर्माण केलेला सरकारी खटला म्हणून मीरत कट खटला ओळखला जातो.३१/२ वर्ष हा खटला चालू होता. इ.स. १९२९ ते १९३३ याकाळात हा खटला चालू होता. ब्रिटिश ट्रेड युनियन कॉंग्रेस व मजूर पक्षाच्या संयुक्त समितीने इ.स. १९३३ मध्ये या खटल्याचे वर्णन "a judicial scandal' या शब्दात केले होते. जानेवारी १९३३ मध्ये या आरोपींना शिक्षा ठोठवण्यात आल्या. या आरोपीपैकी मुझफ्फर अहमद यांना जन्मठेप तर डांगे, घाटे, जोगळेकर, निंबकर आणि स्प्रॅट यांना १२ वर्ष हद्दपारीची व इतरांपैकी कांहीना १० वर्ष तर कांहीना तीन वर्ष हद्दपारीच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या. पुढे या शिक्षेविरुध्द अपील करण्यात आले आणि या शिक्षा आमुलाग्र कमी करण्यात आल्या.मात्र मीरत कट खटल्यामुळे मजूर चळवळीला जबरदस्त हदरा बसला.

मजूर चळवळीतील नेत्यावर मीरत कट खटला सुरु होता त्याच दरम्यान महात्मा गांधीजीनी इ.स. १९३० मध्ये सविनय कायदेभंग चळवळ सुरु झाली होती. याचळवळीमध्ये मजूर वर्गाचाही सहभाग होता. महात्मा गांधीजींना लवकरच अटक झाली. यामुळे जनता संतापली जनतेतून त्रीव प्रतिक्रिया उमटू लागल्या. मुबंईत काळाबादेवी मार्गावर १२ डिसेंबर १९३० रोजी विदेशी कपडे घेऊन जाणाऱ्या ट्रकसमोर आडवे पडून बाबू गेनूने बलिदान दिले. सोलापूरमध्येही महात्मा गांधीजी यांच्या अटकेचे पडसाद उमटले. सोलापूरमध्ये महात्मा गांधीजींच्या अटकेच्या निषेधार्थ शहरभर मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणूकीने गिरणीतील मजूर भारावून गेले. मजूरांना उत्साहाच्या भरात शिस्त पाळणे अवघड जात होते. अशापैकीच गिरणीतील कांही मजूरांनी चौदा कमानीजवळ जावून मद्रास मेल आडविली. मजूर रुळावर बसले जमावाने गाडीच्या ड्रायव्हरला खाली ओढले. मात्र तो दयेची याचना करु लागताच त्यास त्यांनी सोडून दिले. देशासाठी इतर ठिकाणी मजूरांनी सविनय कायदेभंग चळवळीत सहभाग नोंदविला होता. महात्मा गांधीजीची चले जाव चळवळ प्रयत्न सुरु होण्यापुर्वीच महात्मा गांधीसहीत प्रमुख नेत्यांना तुरुंगात टाकले तेव्हा जनतेनेच चळवळ हाती घेतली. चले जाव चळवळीमध्येही मजूरांचा सहभाग होता. महात्मा गांधीजीच्या युनियनचा बालेकिल्ला असलेल्या अहमदाबादमधील ७५ गिरण्यातील १,२५००० मजूर १०५ दिवस संपावर होते. तसेच जमशेदपूरच्या ‘आर्यन अँड स्टिल वर्क्स’ मध्येही संप झाला होता ट्रेड युनियन कॉंग्रेसने २५ सप्टेंबर १९४२ हा दडपशाही– निषेध दिन पाळण्याचा मजूरांना आदेश दिला होता चले जाव चळवळीमध्ये मजूरांचा इतपतच सहभाग होता.

**संदर्भ ग्रंथ**

| | | |
|---|---|---|
| १. आधुनिक भारत | – | श्री बी. एल. ग्रोवर |
| २. आजकालचा भारत | – | रजनी पामदत्त<br>अनु.देवधर य.ना. |
| ३. आधुनिक भारत | – | आचार्य जावडेकर शं.द. |
| ४. आधुनिक भारताचा इतिहास | – | लोहार र. म. |
| ५. आधुनिक भारत (१८८६ –१९४७) | – | सुमित सरकार |



**तुकाराम नारायण शिंदे**

इतिहास विभाग , अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालय,सोलापूर.

## Publish Research Article
## International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org